## ।। अथ प्रार्थना ।।



गुलाब पुष्पा समोर कांती
आजानुबाहू अशी दिव्य मूर्ती
कृपा पूर्ण ती नेत्रदिप्ती सतेज
नसे मानवीदेह हा स्वामीराज ।।१।।
प्रत्यक्ष नरसिंह सरस्वतींचे
जे रुप श्रीपाद श्रीवल्लभाचे
अवधूतमूर्ती अवतार झाला
नमो सद्‌गुरु दत्त स्वामी पदाला ।।२।।
जयाच्या पुढे काळही नम्र झाला
अशा स्वामींच्या पदी मी बाळ आहे
समर्था तुझे पोर ना दीन व्हावे
चरणी तुझ्या ते सदा लीन व्हावे ।।३।।
अनन्य भावे घडो स्वामी भक्ती
करीती तया संत ही सहाय्य प्रीती
ग्रहांची नसे त्या प्रतिकूल भिती
कुलदेवताही अनुकूल होती ।।४।।
पदी भक्त आले कृपापात्र झाले
बहूसिध्द केले, किती उध्दरिले
असामान्य तुमची असे कीर्तिगाथा
म्हणोनिच हा ठेविला पायी माथा ।।५।।
नसे पात्र मी स्वामी तुमच्या कृपेशी
नको सोडू माते तारी या मुलासी
मला संपदा हो तुझे पाय दोन्ही
तुझ्याविण माझे जगी नाही कोणी ।।६।।
फळाली कृपा संतदेवाधिकांची
मिळाली मला जोड स्वामीपदाची
हृदयी ठेव जीव धरी घट्ट पाय
तयासारखी न करी कोण माय ।।७।।
मातेची माया पित्याचीच छाया
दयामूर्तीच्या या नको सोडू पाया
मनीभार ठेवी असे यांच्या ठायी
मिळेना कुठेही अशी स्वामी माया ।।८।।
सदा स्वामी सान्निध्य ऐसे करावे
तुम्ही सहाय्य करी मनी हे ठसावे
जाज्वल्य तुमचा अभिमान राहो
भयाचा मला लेश ना स्पर्श होवो ।।९।।

समर्थ जाणोनी आलो मी पाया
तुम्हीच माझे सर्वस्व व्हाया
कृपेची जरी देशी अल्प निधी
जीवीसारखे मी तयाशी जपेन ।।१०।।
पदी घट्ट ऐसा धरीला असे मी
ध्यानी दिसावे मला याच जन्मी
मी स्वामींचा, स्वामी सर्वस्व माझे
असे प्रेम वाढो गुरुमाय तुझे ।।११।।
मला स्वामीराया तुमचीच छाया
तुम्हाविण देवा करी कोण माया
स्वामी समर्थ गर्जुनी गाओ
या जीवनाचा महायज्ञ होवो ।।१२।।
आधार नाही तुम्हाविण कोणी
नसे अन्नदाता तुम्हाविण कोणी
मातापिता सद्गुरु एक स्वामी
जवळी मला घ्या करी प्रार्थना मी ।।१३।।
स्वामी करावे इतुके करावे
हाती धरावे मला न त्याजावे
होईन मी पात्र तुमच्या कृपेने
अशाच तळमळीविन मी काही नेणे ।।१४।।
प्रभो मी न माझा, तुमचाची होवो
त्वद् इच्छेप्रमाणे ही कृती राहो
असे हे कृपाळा तुम्हा वाहिलो मी
चरणार्विदार्पणमस्तु स्वामी ।।१५।।
जागृत असा जरी अहंभाव हा थोडा
दाखवा सतेज वाट लवकरच तो मोडा
अशी आहे वाट सुंदर वेदांनी रंगलेली
तुम्ही होवोनी राजा माझ्याकडून सेवा तुमची करविली ।।१६।।
असा आहे माल जो तुमचाची भारी
बसा माझ्या पाठी करुनी घ्या सवारी
घालुनी प्रदक्षिणा सुंदर ह्या ब्रह्मांडाला
अनमोल ते परब्रह्म दर्शवावे या बालकाला ।।१७।।
मला खेळवावे मोहक या विश्वात
जसा खेळवितात कान्हा गोपिका त्या गोकुळात
दाखविले जे सत्य देवांनी त्या अर्जुनासी
हाकुनी हा जीवनरथ सत्य गवसावे मजसी ।।१८।।

बसूनी छायेत त्या वटवृक्षाच्या बलवान
जाळीतात भोग असे हो तुम्ही कर्मवान
करावे सार्थक हे जीवन बनूनी मायेची आई
पोहोचवावे उत्तुंग शिखरावर तुम्ही हो बाबासाई ।।१९।।
घडविले अनेक योगी चमत्कारी या नाटकात
उजळवावे जीवन घालूनी भिक्षा या पात्रात
सदा तुमचे सान्निध्य मजपाशीच राहो
करीतो याचना बापूडा तूझपाशी फोडोनी टाहो ।।२०।।
केला अपराध जाणता-अजाणतेपणी
क्षमा करावी मज तुमच्याच दर्शनानी
अशी ही प्रार्थना करीतो मी सेवक
शृंगारावे जीवन तुम्हीच हे भावक ।।२१।।
चरणार्विंदाऽर्पणमस्तु स्वामी ।।

शुभं भवतु ।   शुभं भवतु ।   शुभं भवतु ।